# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
## शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
फोन (0240)2334216(P) 2334769(O) Fax-2356820
www.dteau.org email: roaurangabad.dte@gmail.com


## गट 'क' संवर्गातील पदे भरण्यासाठी व प्रतिक्षा यादीसाठी जाहिरात

| अ. क्र. | पदाचे नांव व वेतनश्रेणी / ग्रेड पे | अ. जाती | अ. जमाती | विजा-अ | भ.ज. ब | भ.ज. क | भ.ज. -ड | वि.मा. प्र. | इ.मा. व. | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संवर्ग-गट-क | | | | | | | | | | |
| ०१ | वरिष्ठ लिपीक (Senior Clerk ) वेतनबँण्ड रु.५२००-२०२००, ग्रे.वे.२४००/- | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ |
| ०२ | कनिष्ट लिपीक (Junior Clerk ) वेतनबँण्ड रु.५२००-२०२००, ग्रे.वे. १९००/- | ०१ | ०२ | ०१ | -- | -- | -- | -- | -- | ०३ (१ महिला) | ०७ |
| ०३ | प्रयोगशाळा सहाय्यक (अस्थी) ( Lab. Asstt.) वेतनबँण्ड रु.५२००-२०२००, ग्रे.वे.२०००/- | -- | ०१ | | | | | | ०१ | ०३ १ ( Partial Deaf & Dumb) | ०५ |
| ०४ | तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक (Technical Lab. Asstt.) वेतनबँण्ड रु.५२००-२०२००, ग्रे.वे.२४००/- | ०३ (१ महिला) | ०२ | -- | -- | -- | -- | -- | ०२ | ०३ (१ महिला) | १० |
| ०५ | जोडारी (Fitter) वेतनबँण्ड रु.५२००-२०२००, ग्रे.वे.२४००/- | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०२ |
| ०६ | पत्रे नि नळकारागीर ( Plumber & sheet metal) वेतनबँण्ड रु.५२००-२०२००, ग्रे.वे.२४००/- | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ |
| ०७ | लोहार (Black Smith) वेतनबँण्ड रु.५२००-२०२००, ग्रे.वे.२४००/- | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ |
| ०८ | मुद्रण निदेशक (Printing Technology) वेतनबँण्ड रु.५२००-२०२००, ग्रे.वे.२४००/- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०१ |
| | एकुण | ०४ | ०९ | ०१ | -- | -- | -- | -- | ०३ | ११ | २८ |

टीप : १. इएसबीसी प्रवर्गातील पदे मा. उच्च न्यायालयातील प्रलंबीत याचिकेच्या अंतीम सुनावणी नंतर भरण्यात येतील.
२. आवेदनपत्र स्विकारण्यासाठी तसेच लेखी परीक्षेसाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित पुणे, (Maharashtra Knowledge Corporation Ltd. (MKCL) Pune यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.
३. अर्ज ऑन लाईन पध्दतीने http://oasis.mkcl.org/jdte 2015 या वेबसाईटवर दि.२० जानेवारी २०१५ ते ३१ जानेवारी २०१५ पर्यंत भरावेत. अपूर्ण अर्ज बाद ठरविण्यात येतील.
४. शैक्षणिक अर्हता, भरती प्रक्रीयेसंबंधिच्या सर्वसाधारण अटी व शर्ती साठी http://oasis.mkcl.org/jdte ही वेबसाईट वा या कार्यालयाची www.dteau.org ही वेबसाईट पहावी.

(महेश शिवणकर)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

## शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि अन्य अटी

| अ. क्र. | पदनाम | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| | संवर्ग-गट-क | |
| १ | वरिष्ठ लिपीक | १. कला/वाणिज्य/शास्त्र/ कायदा यापैकी कोणत्याही शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण. शासकीय कार्यालय किंवा शासकीय उपक्रम किंवा व्यावसायीक आस्थापनामधील प्रशासकीय/लेखा विषयक लिपीक वर्गीय कामकाजाचा एक वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| २ | कनिष्ट लिपीक | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण महाराष्ट्र स्टेट कौंसिल ऑफ एक्झमिनेशन्स यांचेकडील शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प.मि. परीक्षा उत्तीर्ण असलेले प्रमाणपत्र आवश्यक. |
| ३ | प्रयोगशाळा सहाय्यक (अतां) | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण. प्रयोगशाळेतील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| ४ | तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा किंवा शासनमान्य स्वायत्त संस्थेतील पदविका अभियांत्रिकी शाखेतील ३ वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण. व तदनंतर संबधित क्षेत्रातील सर्व्हिसिंग/मेटेनन्स विषय एक वर्षाचा अनूभव आवश्यक. |
| ५ | जोडारी | १. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण २. शासनमान्य आय.टी.आय. जोडारी अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा एन.सी.टी.व्ही.टी. जोडारी अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ६ | लोहार | १. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण २. शासनमान्य आय.टी.आय. लोहार अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा एन.सी.टी.व्ही.टी. लोहार अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ७ | पत्रे नि नळ कारागीर | १. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण २. शासनमान्य आय.टी.आय. तसेच संबंधित तांत्रिक स्वरुपाच्या प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव अपेक्षित शीटमेटल नी प्लंबर/नळकारागीर अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा एन.सी.टी.व्ही.टी. शीटमेटल/ प्लंबर/ नळकारागीर अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ८ | मुद्रण निदेशक | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचा मुद्रण तंत्रज्ञ हा पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण. |

(महेश शिवणकर)
प्र. सहसचांलक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

**टिप :** सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी/ जास्त बदल होण्याची शक्यता आहे.काही पदांच्या वेतनश्रेणीबाबतही बदल होऊ शकतो. काही अपरिहार्य कारणाने भरती प्रक्रिया स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण, सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रदद करणे, अंशतः बदल करणे तसेच सेवाभरतीप्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद स्वतःकडे राखून ठेवीत आहेत. भरती प्रक्रियेसंदर्भात उदभवणारे वाद, तक्रारी तसेच आवश्यक अनुभव इत्यादीबाबत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांचा निर्णय अंतिम राहील.

## सर्वसाधारण अटी :-

**उपर्निर्दिष्ट सर्व पदांसाठी शैक्षणिक अतिरिक्त आवश्यक अर्हता:** वरील सर्व पदांकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी/ वापराबाबतचे D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्याची सेवा समाप्त होईल.

**वयोमर्यादा:**

१) उमेदवाराचे वय सर्व पदासाठी **दि.३१ जानेवारी २०१५ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे असावे.** ( मागासवर्गीय ०५ वर्ष शिथिलक्षम)

२) माजी सैनिक व अपंग भुकंपग्रस्त यांचे बाबतीत ४५ वर्ष पर्यंत कमाल वयोमर्यादा शिथिलक्षम

३) अंशकालीन उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षापर्यंत शिथिलक्षम

४) शासन सेवेतील कर्मचा-यांकरिता सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२००२/३७९/प्र.क्र.२२/०२/१२, दि.१.११.२००३ नुसार वरील पदांसाठी कमाल वयोमर्यादेमध्ये वयाची पूर्णतः सूट अनुज्ञेय नाही. तथापि ज्या पदासाठी अनुभवाची अट विहीत केलेली आहे. फक्त त्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा अधिक अनुभवाचा कालावधी इतपत कमाल वयोमयार्दा शिथिलक्षम करण्यात येईल.

५) दिनांक ३१ जानेवारी २०१५ पर्यंत अनुभव कालावधी गणण्यात येईल.

१) अ) शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र. ६६/२०११/ई-१० दि. २७ जून २०११ नुसार ज्या उमेदवारांकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

ब) सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याचा दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

क) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी लागू राहतील. इतर उमेदवारासाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

२) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

३) प्राथमिक छाननी अंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आलेले नाहीत, अशा उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

४) मागासवर्गीय प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिनिवासी उमेदवारापुरते मर्यादीत राहील. आरक्षीत मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (Caste Validity Certificate) साक्षांकीत प्रत कागदपत्रे पडताळणीचे वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

५) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्रक्र-१०६४/ २०१११६ब दि. १२-१२-२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दिनांक २५-०८-२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधिन राहून, तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्याची नियुक्ती पूर्वलक्षीपणे रदद करण्यात येईल.

६) अ) लेखी परीक्षा खालील ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे अनिवार्य राहील.

ब) १) लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहूपर्यायी स्वरुपाची असेल. २)लेखी परीक्षा मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, अंकगणित या विषयावर घेण्यात येईल. तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक पदासाठी प्रात्याक्षीक परीक्षा अभियांत्रिकी पदविका स्तराच्या अभ्यासक्रमावर अधारीत राहील. जे उमेदवार लेखी परीक्षेत ४५ % व यापेक्षा जास्त गुण मिळवतील असेच उमेदवार रिक्त पदांच्या प्रमाणात गुणवत्तेनुसार व्यावसायिक चाचणी व मुलाखतीस पात्र असतील. ३) लेखी परीक्षेतील एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार व पदांच्या प्रमाणात व्यावसायिक चाचणी व मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. ४) अ.क्र. १ ते ३ नमूद पदांकरिता उमेदवाराची निवड केवळ लेखी परीक्षेच्या आधारे केली जाईल. तसेच अ.क्र. ४ ते ८ नमूद पदांकरिता लेखी परीक्षा, चाचणी व मुलाखतीचे गुण एकत्रित करुन अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल. मुलाखतीस गैरहजर राहिल्यास उमेदवार अंतिम निवडीसाठी अपात्र ठरेल.

७) उमेदवारांना लेखी परीक्षा, व्यावसायीक चाचणी व मुलाखतीसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

**८) लेखी परीक्षा औरंगाबाद येथे घेण्यात येईल. परिक्षेचा दिनांक नंतर जाहिर केला जाईल**

९) एखाद्या उमेदवाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकारे दबाव आणल्यास अथवा गैर प्रकारांचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

१०) लेखी परीक्षेमध्ये फक्त काळया / निळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे.

११) शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.-३१/९८/१६अ दि. १६-३-१९९९ अन्वये समांतर आरक्षणातील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाही तर सामाजिक आरक्षणातील त्या- त्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड करण्यात येईल.

१२) सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडील पत्र क्र. पअंक-१०१०/७१७/प्र.क्र.३२२/१०/१६अ दि. २६ ऑगस्ट २०१० पत्रान्वये एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुस-या पदावर नोकरी मिळण्यासाठी त्यास समांतर आरक्षणाचा लाभ देणे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

१३) महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग ८२/२००१ म.से.आ.-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दि.२५-०५-२००१ मधील तरतुदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक ३१-०३-२०१५ या दिनांकापर्यत वैध असलेल्या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत तसेच मुळ प्रत कागदपत्रे पडताळणीचे वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

१४) खुल्या प्रवर्गातील महिला आरक्षित पदासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याने निर्गमित केलेले जात व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. जर त्या त्यांच्या जात व जात वैधता प्रमाणपत्र सादर करु शकत नसतील तर अशा महिला उमेदवारांनी खुल्या प्रवर्गातून महिलांप्रमाणेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१५) शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र अ.ज. /अ.जा./ अर्जदार वगळून इतरांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत (Non-Cremy-layer Certificate) दिनांक ३१/०३/२०१५ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र, इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत व मूळ प्रती, कागदपत्रे तपासणीचे वेळेस सादर करणे आवश्यक आहे. साक्षांकीत प्रति केंद्र /राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्तर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यानीच केले असावे. तसे नसल्यास व किंवा चूकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल. मुदतीनंतर कोणतेही प्रमाणपत्र स्वीकारले जाणार नाही.

१६) विमुक्त जाती, भटक्या जमती,, इतर मागास वर्गीय व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उमेदवारांनी समाजाच्या उन्नत व प्रगत व्यक्ती गटात मोडत नसल्याबाबतचे ( नॉन क्रिमीलेअर ) दिनांक ३१/०३/२०१५ पर्यंतचे वैध असलेले प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांचा आरक्षित पदासाठी विचार केला जाणार नाही.

१७) शासकीय / निमशासकीय सेवेत असलेल्या कर्मचा-यांनी त्यांचे कार्यालयाचे **"ना-हरकत प्रमाणपत्र"** कागदपत्र पडताळणीचे वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

१८) सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.-१७/२०१०/१२ दि. २८-०३.२००५ व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दि. ०१-०७-२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये दि. २८-०३-२००५ नुसार रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटूंब असल्याचे सोबतच्या नमून्यात प्रतिज्ञापत्र तसेच अवविवाहीत असणा-या अर्जदारांनीही विहित नमून्यातील प्रतिज्ञापत्र कागदपत्रे पडताळणीच्या वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

१९) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती /अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्या उमेदवाराची निवड /नियुक्ती तात्काळ रदद करण्यात येईल /शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

२०) अंतरीम निवड यादीमधील पात्र उमेदवारांच्या प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती मूळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्राच्या मूळ प्रती (Original Copy) कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करून देणे उमेदवारावर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे उपलब्ध करुन न दिल्यास तसेच खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल. उमेदवारांची दाखल केलेली अनुभव प्रमाणपत्रे नियुक्ती दयावयच्या पदाच्या कामकाजाशी संबंधित नसल्यास त्यांना नियुक्ती नाकारण्याचा अधिकार सहसंचालक यांना राहील.

२१) नियुक्त होणा-या कर्मचा-यांना शासन निर्णय क्र.नयो-१००५/१२६/सेवा-४,दि.३१.१०.२००५ प्रमाणे परिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

२२) पुर्ण वेळ कामाचा अनुभव ग्राहय धरला जाईल, तासिका तत्वावर, नियतकालिक, अंशकालिन, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विनावेतन, प्रभारी (Incharge) इत्यादी स्वरूपातील अनुभव ग्राहय धरला जाणार नाही.

२३) अतिरिक्त संवर्ग, आतंर्विभागीय समायोजन व विभागीय बदली इ.वा अन्य कारणामुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी / जास्त होणे) व आरक्षण/समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२४) शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (ESBC) प्रवर्गातील आरक्षणाची पदे भरण्याबाबत मा. उच्च न्यायालयात प्रलंबीत याचिकेच्या अंतीम निकालानंतर कार्यवाही करण्यात येईल.

२४) <u>अर्ज करण्याची पध्दतः</u>

- जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.
- ऑनलाईन अर्ज http://oasis.mkcl.org/jdte 2015 या website वर उपलब्ध राहिल.
- उमेदवाराने ऑनलाईन अर्ज ज्या पदासाठी भरणार आहे, त्या पदाची पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपूर्वक वाचावी. व लहान कुटूंब असले बाबतचे प्रतिज्ञापत्राचा नमूना mkcl च्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
- पदासाठी उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे आणि स्वतःचा अलीकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो व सहीची (Scanned image) स्वतःजवळ असण्याची खात्री करावी. फॉर्म भरतेवेळी आपल्याला फोटो व सहीची image upload करावी लागेल.
- ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी "Apply Online" हया लिंक वर क्लिक करुन अर्ज भरण्यास सुरुवात करावी. आपल्यास अर्ज करावयाचे पद निवडा. एक-एक करत आपल्यास विचारलेल्या प्रश्नांचे ऊत्तर (Yes/NO) पैकी योग्य पर्याय निवडा, संगणक प्रणाली तुम्ही दिलेल्या उत्तराच्या आधारे तुमची प्राथमिक पात्रता तपासेल.
- ज्या प्राथमिक पात्रता चाचणीत आपण पात्र असाल तर, ज्या पदासाठी अर्ज भरायचा आहे, ते पद निवडा आणि आवश्यक माहिती भरा.
- आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणाली तुमचा लॉगीन आय.डी. आणि पासवर्ड निर्माण करुन तुम्हाला तुमच्या स्क्रीनवर लॉगीन आय.डी., पासवर्ड दाखवेल आणि तुम्ही पुरवलेल्या मोबाईल क्रमांकावर SMS करेल (कृपया आपण मोबाईल क्रमांक अचूक टाकावा जेणे करुन आपल्याला लॉगीन आय.डी. आणि पासवर्डची माहिती आपल्या मोबाईल क्रमांकावर SMS व्दारे प्राप्त होईल.) हा लॉगीन आय.डी. म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असेल.
- उमेदवाराच्या माहिती व मदतीकरिता मे MKCL यांच्या कॉल सेंटर वरील दूरध्वनी क्रमांक ९३२६५५२५२५ वर योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.

२५) **प्रक्रिया व परीक्षा शुल्कः** सर्वसाधारण (खुल्या प्रवर्गातील) उमेदवारांसाठी रू. ४०० /- (रुपये चारशे फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) परीक्षा शुल्क असून आवश्यक परीक्षा शुल्क रोखीने State Bank of India च्या कोणत्याही शाखेत संगणकीय चलनाने भरावी.

२६) माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदनशुल्क भरण्याची अट लागू नाही. मात्र त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पूर्ण केल्याबाबतच्या कार्यमुक्त पत्राची साक्षांकित छाया प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.,

२७) सदर परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

२८)

| अ क्र | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज ऑनलाईन नोंदणी करण्यांचा कालावधी | २० जानेवारी २०१५ ते ३१ जानेवारी २०१५ |
| २ | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) च्या शाखांमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | २१ जानेवारी २०१५ ते १ फेब्रुवारी २०१५ |
| ३ | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दि. १ फेब्रुवारी २०१५ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्यांचा कालावधी. | ५ फेब्रुवारी २०१५ |

२९) माहिती भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून आपल्या माहितीसाठी जतन करुन ठेवावी. अर्जदाराने नियमितपणे वेबसाइट चेक करावी.

ऑनलाईन अर्ज पूर्ण भरल्यानंतर अर्जाची प्रत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद कार्यालयाला किंवा MKCL ला पाठविण्याची आवश्यकता नाही.

लेखी परीक्षेचे ओळख पत्र परिक्षापूर्वी तुमच्या लॉगीन मध्ये व वेबसाईटवर उपलब्ध राहील. हयासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

३०) पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परीक्षेत पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणारी परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादीबाबतची माहिती MKCL च्या संबधीत Website वर उपलब्ध आहे.

३१) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी क्रमांक अर्जात नमुद करावा व प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी.

३२) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार, मार्गदर्शन केंद्र, पुणे / कौशल्यविकास या कार्यालयात व आदिवासी विकास विभागाकडे नांव नोदणी केली असली तरी वरील पदासाठी स्वतंत्रपणे रितसर Online अर्ज करणे आवश्यक आहे. नावनोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकीत केलेली छायांकित प्रत कागदपत्रे पडताळणीचे वेळेस सादर करणे आवश्यक आहे.

३३) उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करतांना सतत कार्यान्वीत असलेल्या भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा, जेणेकरुन आपणांस संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

**<u>सर्वसाधारण सूचना :</u>**

१) अर्ज भरण्यापुर्वी अर्जदाराने, जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व आवश्यक अर्हता आपण पूर्ण करत आहोत का याची खात्री करुन घ्यावी. उमेदवार मुलाखतीकरीता व नियुक्तीकरीता पात्र असल्यानंतरच हे कार्यालय मूळ कागदपत्रांच्या संदर्भातील अर्हतेच्या अटींची पडताळणी करेल. या जाहिरातीत नमूद करण्यांत आलेल्या विहित आवश्यक अर्हतेच्या पूर्तीच्या अधीन राहून उमेदवाराचा भरती प्रक्रियेमधील प्रवेश पुर्णतः तात्पुरता असेल.

२) ज्या उमेदवारांनी Online नोंदणी केलेली आहे. आणि आवश्यक आवेदन शुल्क अदा केलेले आहे व संपूर्ण माहिती भरुन प्रिंट काढलेली आहे, त्यांना लेखी परीक्षेकरीता Online Call Letters Download करण्याची मुभा आहे. Online call Letters पाठवितांना अर्जाची तपशीलवार छाननी करण्यात येणार नाही. Call Letters, http://oasis.mkcl.org/jdte 2015या संकेत स्थळावरुन Download करता येतील.

३) परीक्षेकरीता येताना उमेदवारांना पॅन कार्ड / आधार कार्ड / वाहन चालवण्यांचा परवाना / पासपोर्ट / मतदान कार्ड इत्यादी सोबत आणावे.

४) ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराने आपली संपूर्ण शैक्षणिक माहिती भरावी. जसे की, ( १० वी / १२ वी/ डिप्लोमा / ग्रॅज्युएशन )

(महेश शिवणकर)
प्र.सहसचांलक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

दिनांक १७ जानेवारी २०१५